+

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. महिला व बाल कल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १३

**सभावृत्तांत**

दिनांक :- २५ / १० / २०१२ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक - २५ / १० / २०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. भारती फरांदे - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. जवळकर वैशाली राहुल
४) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
५) मा. आल्हाट मंदा उत्तम
६) मा. सौ. ठाकरे मंदाकिनी अर्जुन
७) मा. बाबर शारदा प्रकाश

याशिवाय मा.सतिश कुलकर्णी - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.जगताप - समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे - सहा. प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचा विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.१ :- आठवडा बाजाराचे आयोजन करणेबाबत मा. वैशाली जवळकर , मा. मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

----------

**दिनांक १०/१०/२०१२ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक १२ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.**

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला -**

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक - १
दिनांक - २५/१०/२०१२
सूचक - मा. वैशाली जवळकर अनुमोदक - मा. मंदाकिनी ठाकरे
संदर्भ - मा. वैशाली जवळकर, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजनेमधील दिपावली निमित्त प्रस्तावात नमुद आठ ठिकाणी आठवडा बाजाराचे आयोजन करण्यास व त्याकरिता प्रत्येकी पन्नास स्टॉल उभारणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती कडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

या नंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( भारती फरांदे )**
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/ १३९० /२०१२
दिनांक :- २९ / १० / २०१२

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.